No. EAU/ICD/2017-18/192

४क्र. ३/२०१७-१८

व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा ***शुक्रवार, दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता*** सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई -४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते:-

१. डॉ. देवानंद शिंदे - ( प्रभारी कुलगुरू)

२. डॉ. धिरेन पटेल - ( प्रभारी प्र-कुलगुरू)

३. डॉ. रोहीदास काळे - ( सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग)

४.डॉ. दिनेश कांबळे - ( प्रभारी कुलसचिव)

श्री. विजय फ. तायडे, स्थानापन्न वित्त व लेखा अधिकारी आणि डॉ. अर्जुन घाटुळे, स्थानापन्न संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ हे निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

सभा सुरू होण्यापुर्वी मा. कुलगुरू, प्र-कुलगुरू व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांची नव्यानेच नियुक्ती करण्यात आल्याने तसेच कुलसचिवांचेही व्यवस्थापन परिषदेतर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

➢ **श्रध्दांजली -**

**श्री. श्रीराम मंत्री**

शिक्षणतज्ज्ञ आणि लेखक श्रीराम मंत्री यांचे वृध्दापकाळाने दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

**श्री. सीताराम पांचाळ**

अभिनेते श्री. सीताराम पांचाळ यांचे कर्करोगाने दिनांक १० ऑगस्ट, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५४ वर्षांचे होते.

## श्री. चिं. त्र्यं. येवलेकर

शिक्षण महर्षी श्री. चिंतामण त्र्यंबक येवलेकर यांचे दिर्घ आजाराने दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९४ वर्षांचे होते.

## श्री. पदमाकर आ. पुरोहित

आदर्श शिक्षक श्री. प. आ. पुरोहित यांचे दिर्घ आजाराने दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९१ वर्षांचे होते.

## श्रीमती शिरीष पै

ज्येष्ठ कवियत्री श्रीमती. शिरीष पै यांचे दिर्घ आजाराने दिनांक ०१ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८८ वर्षांच्या होत्या.

## श्री. संभाजीराव म्हसे पाटील

राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष व मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत न्यायमूर्ती श्री. संभाजीराव म्हसे पाटील यांचे पोटाच्या विकाराने दिनांक ०२ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षांचे होते.

## श्री. पद्माकर कार्येकर

ज्येष्ठ पत्रकार आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचे माजी कोषाध्यक्ष श्री. पद्माकर कार्येकर यांचे ह्दयविकाराने दिनांक ०७ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७४ वर्षांचे होते.

## श्री. विठोबा पांचाळ

आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिल्पकार व छायाचित्रकार श्री. विठोबा पांचाळ यांचे ह्दयविकाराच्या तीव्र झटक्याने दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते.

## मार्शल अर्जन सिंग

वायुदलाचे प्रथम आणि एकमेव मार्शल अर्जन सिंग यांचे ह्दयविकाराच्या झटक्याने दिनांक १६ सप्टेंबर, २०१७ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९८ वर्षांचे होते.

वरील मान्यवरांसहित मुंबई विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी जे या काळात निधन पावले त्यांनाही भावपूर्ण श्रध्दाजंली अपर्ण करण्यात आली.

बाब १: दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचे इतिवृत्त खालील सूचना व दुरूस्तीसहित मंजूर करण्यात यावे.

**दुरूस्ती: बाब ९ बाबत :** व्यवस्थापन परिषदेत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६, कलम ५७ मधील तरतुद स्पष्ट असल्यामुळे क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ गठीत करण्याबाबतच्या प्रस्तावावरिल ठराव रदद् करून खालीलप्रमाणे सुधारित ठराव पारित करण्यात यावा.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६, कलम ५७ मधील तरतुदीनुसार क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ गठीत करण्याबाबत संबधित विभागाने निवडणूक विभागाकडे कार्यवाही करण्याकरिता प्रस्ताव सादर करावा.

असाही ठराव करण्यात आला की, कोणतीही बाब परिषदेत ठेवतांना संबंधित विभागांनी तपासून घ्यावी.

बाब २: दिनांक १७ मे, २०१७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेचा कार्यवाही अहवाल संमत करणेबाबत.

ठराव: असा ठराव करण्यात आला की, दिनांक १७ मे, २०१७ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवाही अहवाल खालील सूचनेसह संमत करण्यात यावा.

'अप्राप्त' ऐवजी कार्यवाही झाली आहे असे वाचावे. ज्या-ज्या ठरावांवर कार्यवाही झालेली आहे त्याबाबत सुस्पष्टपणे कार्यवाही अहवाल सादर करण्याची सूचना विभागांना करण्यात यावी व पुढच्या सभेपासुन स्पष्टपणे कार्यवाही अहवाल परिषदेपुढे सादर करण्यात यावा.

बाब ३: The matter of temporary employees whose services were not extended after 30th June, 2017 and the some of the temporary staff appointed as fresh due to exigency of work on the basis of undertaking given by the employees as per minutes of the meeting dated 14th August, 2017. (including specialized professionals) as well as of those temporary employees whose services will cease to exist from any time between July, 2017 to December, 2017 is kept for consideration of Management Council.

A) 183 temporary employees whose period had expired on 30th June, 2017 may be extended/ fresh appointment be given on the basis of the undertaking and only on the basis of recommendations received from the different Sections/ Units.

B) Whether 227 temporary employees whose period of six months is expiring between July to December, 2017 may be extended/ fresh appointment be given.

C) The specialized professionals whose services were not extended from 1st July 2017 onwards may be extended and fresh appointment be given.

D) Post-facto sanction be granted to appointment of 21 professional temporary employees of C.C.F. and 2 other temporary employees whose names were in the list of 467 employees not given extension as per order dated 30th June, 2017 but later given appointment letter due to urgency requiring immediate attention in Examinations Section.

E) Temporary Employees who have been kept in services due to workload by different departments/sections/units in spite of University circular No.EST/ICD/2017-18/858, dated 8th August, 2017 should not be issued and also no post-facto sanction shall be given for the temporary employees who are kept without orders from Establishment Section, University of Mumbai .

तात्पुरते कर्मचारी वर्षानुवर्षे नियुक्त करण्यात येत असल्याने विद्यापीठासामोर अनेक प्रकारच्या कायदेशिर अडचणी निर्माण होत असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणले. याबाबत वित्तीय, कायदेशीर व प्रशासकीय स्वरूप, तसेच सांख्यिकी माहिती प्राप्त झाल्यानंतर धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, असे मत काही सदस्यांनी व्यक्त केले. तसेच परीक्षा विभागात आता नविन तंत्रज्ञानाचा वापर होत असल्याने मनुष्यबळ कमी लागेल व त्यामुळे काही विभागांचे मनुष्यबळ दुसरीकडे वापरता येईल, असे मत सदस्यांनी व्यक्त केले. परीक्षा विभागात हंगामी कर्मचा-यांच्या नेमणुका करण्याऐवजी कायमस्वरूपी कर्मचा-यांच्या नेमणूका करण्यात याव्यात, असे मतही काही सदस्यांनी व्यक्त केले.

विद्यापीठामध्ये अनुदानित व विनाअुनदानित पदांचा प्रश्न कित्येक वर्षापासून प्रलंबित असल्याने अनेक वर्षांपासून शासनाने वेतन अनुदान देण्याचे थांबविले आहे. शासनाने हा प्रश्न कायमस्वरूपी निकालात काढण्यासाठी एक 'टास्कफोर्स' निमार्ण केला होता. टास्कफोर्सने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला असून त्या अहवालाबाबत विद्यापीठास अधिकृतपणे काहीही कळविण्यात आले नसल्याने कोणत्या संवर्गात कोणते कर्मचारी शासनमान्य पदावर आहेत हे निश्चित करण्यात आले नसल्याने भरती व पदोन्नती करणे अशक्य झाले आहे. पुरेशा कर्मचा-यांच्या अभावी विभागांना काम करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. तात्पुरत्या कर्मचा-यांपैकी ब-याच कर्मचा-यांनी न्यायालयातून स्थगिती आणली आहे. ४५० कर्मचा-यांना जून, २०१७ नंतर नविन आदेश निर्गमित करण्यात न

आल्याने विविध विभागांमध्ये कर्मचा-यांच्या अभावी निर्माण झालेल्या गंभीर परिस्थिती बाबतही सखोल चर्चा करण्यात आली.

विद्यापीठाने माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे अपेक्षित आहे; परंतू त्यासाठी कायमस्वरूपी तांत्रिक मनुष्यबळ विद्यापीठाकडे उपलब्ध नाही. तात्पुरत्या कर्मचा-यांची भरती करून तंत्रज्ञानाचा ऐवढा मोठा डोलारा चालविणे अशक्य आहे. त्यासाठी विविध उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. तांत्रिक स्वरूपाची पदे तीन किंवा पाच वर्षाच्या कंत्राटावर भरता येतील काय याचाही विचार करण्यात यावा, असे काही सदस्यांनी सुचविले.

अनेक विभागांमध्ये तात्पुरते कर्मचारी नियुक्त करताना कोणत्याही प्रकारचा विचार करण्यात आला नसल्याने अनेक विभागांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त तात्पुरते कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमध्ये कोणताही विचार न करता कायमस्वरूपी व तात्पुरते कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. शैक्षणिक विभागांना देण्यात येणा-या प्रशासकीय कर्मचा-यांच्या सेवेचा योग्य प्रकारे वापर होत नसल्याने विभागांना अनेक प्रकारच्या अडचणी येत असल्याचे निदर्शनास आणण्यात आले.

प्रत्येक विभागांना साधारणपणे सर्व प्रकारची प्रशासकीय कामे करावी लागतात.

परंतू मनुष्यबळाच्या अभावामुळे तसेच अनुभवी मनुष्यबळाच्या अभावामुळे विभाग प्रमुखांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. प्रशासकीय अडचणींमुळे विभाग प्रमुखांना तसेच शिक्षकांना शिकवण्याच्या व संशोधनाच्या तसेच अन्य शैक्षणिक बाबींकडे लक्ष देण्यास पूरेसा वेळ मिळत नाही.

विद्यापीठातील मनुष्यबळाचा अधिक कार्यक्षमतेने वापर करण्यासाठी व सध्याच्या परिस्थितीत अनेक शैक्षणिक विभाग कर्मचारी विरहीत असल्याने विभागांची अडचण लक्षात घेता कुलसचिवांनी स्पष्ट केले की, विद्यापीठातील अनुदानित व विनाअनुदानित शैक्षणिक विभाग (यु.जी./पी.जी.) असून प्रत्येक विभागामध्ये विविध कर्मचारी संख्या आहे. शैक्षणिक विभागाच्या प्रशासनाकरिता शैक्षणिक प्रशासन कक्ष तयार केला व त्यात शैक्षणिक विभागांना शाखा निहाय/इमारत निहाय शैक्षणिक प्रशासन कक्षातर्फे (Academic Administration Cell) प्रशासकीय सेवा दिली तर सध्याच्या मनुष्यबळापैकी ३०% ते ४०% मनुष्यबळामध्ये या विभागांचे प्रशासन अधिक कार्यक्षमतेने चालविता येईल. शिक्षकांना प्रशासकिय कामे करण्यासाठी कुशल प्रशासकिय कर्मचारी उपलब्ध होतील. कर्मचारी कोणत्याही कारणास्तव अनुपस्थित व रजेवर गेल्यास विभागांची गैरसोय होणार नाही. वरिलपैकी शिक्षकांच्या अनेक प्रशासकीय जबाबदा-या कमी होतील. याबाबत व्यवस्थापन परिषदेने समिती नेमली तर मोठया प्रमाणात महसूल वाचेल व सुटसुटीतपणा येईल. यासाठी उपकुलसचिव किंवा सहायक कुलसचिव या दर्जाच्या अधिका-यांच्या नेतृत्वाखाली आवश्यकेनुसार प्रशासकीय कर्मचारी उपलब्ध करून चांगल्या सेवा विभागांना देता येतील. यामुळे प्रशासनाची गुणवत्ता वाढेल तसेच आर्थिक काटकसर करता येईल व सध्याच्या व्यवस्थेस धक्का न लावता व्यवस्था अधिक बळकट करण्यात येईल.

कुलसचिवांनी १२६६ तात्पुरत्या कर्मचा-यांची विभागणी कशी करता येईल याबाबत वर्ग-३ व वर्ग-४ मधील कर्मचा-यांच्या बाबतीत दोन समित्या गठीत करण्यात आल्याचे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे शासन मान्य पदांचा पुन्हा सुधारीत आढावा सादर करणे आवश्यक असल्याने त्यासाठी असलेल्या मार्गदर्शक तत्वांचा अभ्यास करण्यासाठी एक समिती गठीत करण्यात आल्याचे कुलसचिवांनी सांगितले. समितीच्या माध्यमातून प्रत्येक विभागात/कक्षात

किती तात्पुरत्या कर्मचा-यांची गरज आहे; त्याचा अंदाज आल्यावर गरजेनुसार नियुक्ती करणे सोपे जाईल.

गरजेनुसार तात्पुरते कर्मचारी आवश्यक असल्यास शासन निर्णयानुसार कंत्राटी पध्दतीने निवृत्त झालेल्या कर्मचा-यांना नियुक्त करणे किंवा मनुष्यबळ पुरविणारी एजन्सी नियुक्त करणे याबाबतही चर्चा करण्यात आली.

आपण एक सर्वसमावेशक आढावा घेतला तर काही महिन्यानंतर अनेक अडचणींवर मात करता येईल.

वरिल प्रमाणे सखोल चर्चेनंतर याबाबत खालील ठराव करण्यात आले:-

A) 183 temporary employees whose period had expired on 30th June, 2017 may be extended/ fresh appointment be given on the basis of the undertaking and only on the basis of recommendations received from the different Sections/ Units.

(१) असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठासमोरील सध्याची व भविष्यातील आव्हाने आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील विविध तरतुदींचा विचार करता प्रशासकीय सुधारणा करणे आवश्यक असल्याने विद्यापीठातील प्रशासकीय पदे, कामाचे स्वरूप व इतर प्रश्नांचा आढावा घेण्यासांठी सर्व समावेशक अशी एक तज्ज्ञांची समिती गठित करून आढावा घेण्यात यावा. असाही ठराव करण्यात आला की, याबाबतची समिती गठीत करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात यावेत.

त्यानंतर असाही ठराव करण्यात आला की, तात्पुरत्या कर्मचा-यांचा प्रश्न दिवसेंदिवस जटील होत असल्याने मुनष्यबळ पुरविणा-या एजन्सीजकडून टेंडर/ई-टेंडर मागविण्यात यावे व त्या माध्यमातून वाढत्या मनुष्यबळाची

गरज भागविण्यात यावी. तसेच काही विशिष्ट प्रकारच्या कामासाठी शासन निर्णयानुसार निवृत कर्मचारी/अधिकारी नियुक्त करण्यात यावेत.

(२) असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील तात्पुरत्या सेवेत असलेल्या ज्या १८३ कर्मचा-यांचा कालावधी जून, २०१७ दरम्यान संपुष्टात आला होता व ज्यांनी विद्यापीठाकडे हमी पत्र सादर केले तसेच विभाग प्रमुखांनी त्यांच्या विभागात कर्मचा-यांची नितांत गरज असल्याची आणि विभागातील कर्मचा-यांबद्ल अनुकूल शिफारस केली असेल अशा कर्मचा-यांना तात्पुरत्या स्वरूपात तीन महिन्यांसाठी नव्याने नेमणुका देण्यात याव्यात.

असाही ठराव करण्यात आला की, जे कर्मचारी पूर्ण अर्हताधारण करित असतील त्यांना एकत्रित वेतनावर आणि जे कर्मचारी पूर्ण अर्हताधारण करित नसतील त्यांना रोजंदारीवर नव्याने ३ महिन्यांसाठी नियुक्त करण्यात यावे. (दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेतील बाब क्र. १ मधील वित्त व लेखा समितीच्या दिनांक ४ जुलै, २०१५ च्या सभेतील बाब क्र. ११ नुसार)

असाही ठराव करण्यात आला की, कुलसचिवांनी याबाबत नेमलेल्या समितीने घेतलेला आढावा विचारात घेऊन ज्या विभागात अत्यावश्यक असेल तिथेच आवश्यकतेनुसार तात्पुरते कर्मचारी नियुक्त करण्यात यावेत.

(३) असाही ठराव करण्यात आला की, विद्यापीठातील शैक्षणिक विभागांना शैक्षणिक प्रशासकिय कक्षातर्फे एकत्रितपणे प्रशासकीय सुविधा पुरविण्यासाठी प्राध्यापक, प्राचार्य, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी प्रतिनिधी व प्रशासनातील/व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची समिती गठीत करण्यात यावी. समितीने सर्व संबंधित घटकांशी चर्चा करून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करावा.

असाही ठराव करण्यात आला की, समिती गठीत करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात यावेत.

(४) असा ठराव करण्यात आला की, शासनाने अनुदानित/विनाअनुदानित पदांवरिल कर्मचा-यांच्या पदांना निश्चित करण्यासाठी नियुक्त केलेल्या टास्क फोर्स समितीच्या अहवालाबाबत विद्यापीठाने शासनाकडे पाठपुरावा करावा.

B) Whether 227 temporary employees whose period of six months is expiring between July to December, 2017 may be extended/ fresh appointment be given.

असा ठराव करण्यात आला की, ज्या २२७ तात्पुरत्या कर्मचा-यांच्या सेवा जुलै १७ ते डिसेंबर २०१७ या कालावधीत संपणार आहेत त्यांना परत सेवेत घेण्यात येवू नये.

C) The specialized professionals whose services were not extended from 1st July 2017 onwards may be extended and fresh appointment be given.

D) Post-facto sanction be granted to appointment of 21 professional temporary employees of C.C.F. and 2 other temporary employees whose names were in the list of 467 employees not given extension as per order dated 30th June, 2017 but later given appointment letter due to urgency requiring immediate attention in Examinations Section.

असा ठराव करण्यात आला की, माहिती व तंत्रज्ञानाची गरज लक्षात घेता आणि सध्या विद्यापीठामध्ये परिक्षेच्या निकालासंबंधी आणि विद्यापीठातील प्रशासकीय विभागांना लागणा-या तंत्रज्ञानाची गरज लक्षात घेऊन अत्यंत आवश्यक असलेल्या अतीकुशल कर्मचा-यांच्या/व्यवसायिकांच्या १ जुलै, २०१७ पासुन सहा महिन्यांकरिता नियुक्त्यांना पुर्वलक्षी प्रभावाने मान्यता देण्यात यावी.

त्यानंतर असा ही ठराव करण्यात आला की, माहिती व तंत्रज्ञानाची गरज लक्षात घेता अत्यंत आवश्यक असलेली तंत्रज्ञानाची व अतिकुशल आणि कुशल संवर्गातील प्रत्येक क्षेत्रातील किमान १ पद विद्यापीठाच्या आस्थापनेवर रितसर भरती प्रक्रीया राबवुन कायमस्वरूपी भरण्यात यावे व अन्य पदे पाच किंवा तीन वर्षाच्या करारावर भरण्यात यावीत. करार संपल्यावर पुन्हा नविन प्रक्रीया करण्यात यावी. विद्यापीठावर आर्थिक भार येवू नये तसेच कायदेशिर अडचणी निर्माण होणार नाहीत यासाठी विधी सल्लागारांचा सल्ला घेण्यात यावा.

विद्यापीठातील तांत्रिक विभागातील उपलब्ध मनुष्यबळाचा विचार करता असा ठराव करण्यात आला की, युसीसी/सीसीएफ व अन्य तांत्रिक विभागातील कामाचे स्वरूप, उपलब्ध यंत्रसामग्री, तांत्रिक मनुष्यबळ व तांत्रिक कर्मचा-यांचे प्रश्न इत्यादी विषयांबाबत सखोल अभ्यास करून हे विभाग अधिक बळकट करण्यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञ डॉ. धिरेन पटेल, प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात यावी. अन्य सदस्यांचे नामनिर्देशन करण्याचे अधिकार कुलगुरूंना प्रदान करण्यात यावेत. समितीने एक महिन्यात अहवाल सादर करावा.

सध्याच्या परिस्थितीत C.C.F विभाग व परिक्षा विभाग यांच्यातील समन्वयाचा अभाव व त्यामुळे निर्माण होणारे गंभीर प्रश्न विचारात घेता असा ठराव करण्यात आला की, परिक्षांचे नियोजन व प्रशासन अधिक कार्यक्षमतेने करण्यासाठी 'C.C.F विभाग' संचालक परिक्षा व मुल्यमापन यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यात यावा. सी.सी.एफ. चे संचालक हे मात्र पूर्वीप्रमाणेच NIRF व IQAC विभागात कार्यरत राहतील.

E) Temporary Employees who have been kept in services due to workload by different departments/sections/units in spite of University circular No.EST/ICD/2017-18/858, dated 8th August, 2017 should not be issued and also

no post-facto sanction shall be given for the temporary employees who are kept without orders from Establishment Section, University of Mumbai .

असा ठराव करण्यात आला की, ज्या हंगामी कर्मचा-यांना आस्थापनाचे पत्र क्र. ई.सी.टी./ आय.सी.डी. /२०१७-१८/८५८ दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ अन्वये सेवा खंडित केल्या आहेत त्यांना परत सेवेत घेण्यात येवू नये. परंतु त्यांनी विद्यापीठात सेवा केली असल्याने त्यांना दिनांक ३०/१२/२०१७ पर्यंत प्रचलित नियमानुसार वेतन देण्यात यावे.

त्याचप्रमाणे असाही ठराव करण्यात आला की, प्रशासनाचे आदेश नसताना जे विभाग प्रमुख कर्मचा-यांना परस्पर सेवेत ठेवतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी आणि अशा कर्मचा-यांचे वेतन विद्यापीठाने देऊ नये. विद्यापीठ अत्यंत कठीण परिस्थितीतुन मार्गक्रमण करित असल्याने सर्व विभाग प्रमुखांसह शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी विद्यापीठास सहकार्य करावे, असे आवाहन व्यवस्थापन परिषदेतर्फे करण्यात यावे.

चर्चेच्या अनुषंगाने खालील बाबतीत चर्चा करण्यात आली.

अ) परीक्षेच्या अभुतपुर्व प्रसंगी परीक्षा संचालक, यंशवतराव चव्हाण विद्यापीठ यांची शासनाने नियुक्ती केली. त्याचप्रमाणे अन्य विद्यापीठांतील उदा. सोलापुर, पुणे, येथील अधिका-यांनी देखिल आपल्याला या परीक्षेच्या कामामध्ये सहकार्य केले आहे. त्यांना मानधन देण्याबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला.

संचालक, परिक्षा व मूल्यमापन मंडळ, यांनी खालील प्रमाणे निवेदन केले:-

दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ नंतर रूजू झालेले व त्याच्या पुर्वी काही तज्ज्ञ मंडळीची परीक्षेच्या कामात मदत घेण्यात आली होती; त्यात काही निवृत्त कर्मचारी, प्रोफेसर, वरिष्ठ व कनिष्ठ टंकलिपिक सुध्दा आहेत.

एकदंरित असे वाटते की, यांनी आपल्याला अत्यंत कठीण प्रसंगी सेवा दिली असल्याने विद्यापीठाच्या नियमांच्या अधिन राहून त्यांना किमान मानधन दयावे. आपण त्यांना प्रवासभत्ता देतो. त्याबाबत या सभागृहात मागदर्शन व्हावे, अशी विनंती संचालक, परिक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केली. याबाबत प्रभारी वित्त व लेखा अधिकारी, श्री. व्ही. एफ. तायडे यांनी या विषयावर मार्गदर्शन केले.

सखोल चर्चेनंतर असा ठराव करण्यात आला की, शिक्षकांना प्रति दिवशी २०००/- रूपये व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना १०००/- रूपये मानधन म्हणून देण्यात यावे. शिक्षक/कर्मचा-यांच्या नावांची यादी मानधनाच्या रक्कमेसह संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी प्रस्तावीत, करावीत.

ब) चर्चेच्या अनुषंगाने मा. कुलगुरूंनी सुचित केले की, व्यवस्थापन परिषदेपुढे बाबी सादर करताना संबधीत विभागांनी बाबींसोबत संबधीत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदी, परिनियम, आदेश, विनियम व शासन निर्णयाचा संदर्भ देऊन छायांकित प्रतीसह सादर कराव्यात.

क) गट विम्याबाबत माहिती देताना श्री. व्ही. एफ. तायडे, वित्त व लेखा अधिकारी म्हणाले की, मागील व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ७ ऑगस्ट,२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये गट विम्याबाबत झालेल्या ठरावानुसार गट विमा योजनेसाठी रक्कम देण्यात आली. पुर्वी हि रक्कम १ कोटी ५६ लाख ३५ हजार होती; परंतु वाटाघाटी झाल्यानंतर ती रक्कम कमी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. व्ही. एफ. तायडे वित्त व लेखा अधिकारी यांनी खालीलप्रमाणे माहिती सादर केली.

| अनु क्र. | माहितीचा तपशिल | महिती |
|---|---|---|
| १. | वैद्यकिय भत्ता | रू. ३५००/- ते रू. ४०००/- |
| २. | गट विम्याचा हक्क घेण्यासाठी एकुण कर्मचारी | रू. १२१०/- |
| ३. | १२१० कर्मचा-यांसाठी एकुण रक्कम | रू. १,५६,३५,०००/- |
| ४. | संमंती दिलेले कर्मचारी | रू. ८२९/- |
| ५. | चर्चेनंतर कमी झालेली रक्कम | रू. १,०७,४०,०००/- (जीएसटी सहित) |
| ६. | कर्मचा-यांकडुन प्रतिमहा आकारण्यात येणारी रक्कम<br><br>एकूण रक्कम (८२९ x १२ x १५०) | रू.१५०/- (Irrespective of Grades)<br><br>रू. १४,९२,२००/- |
| ७. | विद्यापीठाने दयावयाची रक्कम | रू. ९४,००,०००/- + जीएसटी |

८२९ कर्मचा-यांनी संमंती पत्र दिल्यानंतर उर्वरीत जे कर्मचारी या योजनेचा लाभ घेऊ इच्छीतात त्यांची संख्या विचारात घेऊन पुन्हा कंपनीसोबत चर्चा करून वरिल प्रमाणेच रक्कम निश्चित करावी.

याबाबत असा ठराव करण्यात आला की, ज्या कर्मचा-यांना मेडीकल विमा नको असेल त्यांना पूर्वी प्रमाणे वैद्यकीय भत्ता देण्यात यावा.

अध्यक्षांचे आभार व्यक्त करून त्यांच्या परवानगीने सभा समाप्त झाल्याचे घोषित करण्यात आले.

SKSawant 16/11/2017

सहायक कुलसचिव

१६/११/१७

उपकुलसचिव

इतिवृत्त मान्य करावे.

१६/११/१७

प्र. कुलसचिव

27.11.2017

प्र. प्र-कुलगुरू

28/11/17

प्र. कुलगुरू